# क्विक हीलतर्फे आज 'साय-फाय आर्ट्स महोत्सव

**पुणे** : भविष्य सुरक्षित करणे हे आपले सीएसआर ध्येय अधोरेखित करून 'क्विक हील'ने महाराष्ट्र सायबर आणि विश्वकर्मा विद्यापीठाच्या सहकार्याने 'साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हल २०१९'ची घोषणा केली. विश्वकर्मा विद्यापीठात आज हा महोत्सव होत असून, त्यासाठी चित्रपट, रंगभूमी आणि दूरचित्रवाणी क्षेत्रातील आघाडीच्या व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेचे माजी अधिष्ठाता प्रा. समर नखाते प्रमुख पाहुणे आहेत. सायबरसुरक्षेला चालना देण्यासाठी युवा अभिव्यक्तीच्या ताकदीच्या साह्याने समाजात ठसा उमटवणे, असा उद्देश असलेला साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हल हा कलात्मकता आणि सर्जनशीलतेचा अनोखा उत्सव आहे.